प्रेस नोट

सोलापूर दि.२६/०४/२०१६ - सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पो लि. या सोलापूर स्मार्ट सिटीच्या कंपनीकरीता लोगो कॉम्पीटीशन आयोजित करण्यात येत आहे.

केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी या महत्वकांक्षी योजनेमध्ये सोलापूर शहराचा ९ वा क्रमांक आला आहे.शासन सुचने प्रमाणे सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पो.लि.या कंपनीची स्थापना करण्यात आली आहे.या कंपनी मार्फत सोलापूर शहर स्मार्ट सिटी होणे करीता विविध प्रकारे विकास केला जाणार आहे. या कंपनीसाठी लोगो डिझाईन करणे करीता कॉम्पीटीशन आयोजित करणेत आले आहे.

स्पर्धेसाठी नियम व अटी

१. सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पो.लि.हे नाव लिहून लोगो तयार करणेत यावे.
२. सदर लोगो हा रंगित असावा.
३. सदर लोगो पाठविणेसाठी अंतिम मुदत २ मे २०१६ अखेर पर्यंत राहील.
४. स्पर्धेत आलेल्या एकूण लोगो डिझाईन पैकी एका डिझाईनची निवड केली जाईल.येथे ही बाब प्रामुख्याने नमूद करण्यात येते की सदर निवडणेत आलेले लोगो हे सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पो.लि.या कंपनीच्या सर्व प्रसिध्दी कार्यक्रमासाठी लेटरपॅडवर, पाकिटे इ.साठी वापरण्यात येईल.त्यासाठी संबंधित डिझाईनरची कोणतीही हरकत असणार नाही.
५. लोगो कोरल ड्रॉ किंवा इलेस्ट्रेटर या सॉफ्टवेअर मध्ये तयार करणेत आलेले असावे तसेच पी डी एफ व जे पी ई जी या दोन्ही नमुन्यामध्येही पाठवावी. सदरचा लोगो हा पुर्णतयः स्वनिर्मीत (Own creativity) असला पाहिजे. त्याबाबत भविष्यात पुढे कॉपी राईटचा आक्षेप आलेस सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड जबाबदार राहणार नाही.
६. लोगोसह डिझाईनरने त्याचा पत्ता, मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी solapurcitydcl@gmail.com या ई-मेलवर पाठवावा.
७. निवडणेत आलेले सर्वोत्कृष्ठ लोगोसाठी र.रु.१५,०००/-इतके पारितोषिक दिले जाईल.
८. जाहिर केलेला निकाल अंतिम असेल.स्पर्धेचे सर्व अधिकार संचालक मंडळ,सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (SCDCL) यांचेकडे राखीव आहेत.

सोलापूर शहर स्मार्टसिटी होणेसाठी प्रशासकीय धोरणासह लोकसहभाग ही (Citizen engagement) महत्वाचा आहे.याचा विचार होऊन जास्तीत जास्त स्पर्धाकांनी या स्पर्धेत सहभाग घ्यावा अशी विनंती करणेत येत आहे.

sd/-

अध्यक्ष

सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड(SCDCL)

सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन,पार्क चौक,सोलापूर-४१३००१

जा/मु ७८० २६/४/१६